निशाणी क्र. २९.

अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. ३ (नंदकुमार गणपतराव पाटील ) यांचा उलटतपास गैरअर्जदार क्र. १ व २ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. सुर्यवंशी -

१. दि. १९.०९.२००७ रोजी मी नागनाथ खराडे यांच्या जमिनीमध्ये मुल्यांकन करण्याकरीता गेलो होतो. त्या दिवशी मी त्यांच्या जमीनीमध्ये मुल्यांकन करण्याकरीता गेलो होतो, याचा माझेकडे कागदोपत्री पुरावा आहे. त्या दिवशी मी भूसंपादन अधिकारी, तलाठी, कृषी अधिकारी व कार्यकारी अभियंता यांना नोटीसा दिल्या नाहीत. मला गट क्र. ५०४ च्या चतु:सिमा अभिलेख पाहिल्याशिवाय सांगता येणार नाहीत. मी लगतच्या शेतक-यांना नोटीसा दिल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, दि. १९.०९.२००७ रोजी मी शासन मान्य मुल्यांकन अधिकारी नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी institution of valuer चे प्रमाणपत्र दाखल केले आहे. ते प्रमाणपत्र दि. ०९.०८.२००८ रोजीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर मी मुल्यांकन अहवाल दि.१८.०८.२००८ रोजी दिलेला आहे. दि. १९.०९.२००७ रोजी मी जमीन गट क्र. ५०४ मध्ये गेलो होतो, त्यानंतर मी गेलो नाही. दि. १८.०८.२००८ रोजी मी मुल्यांकन अहवाल दिले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जमीन गट क्र. ५०४ मध्ये लहान आंब्याचे झाड होते. हे म्हणणे खरे नाही की, मी झाडाचे जे वय शपथपत्रात नमुद केले आहे ते चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्र दाखल करण्यापुर्वी मी माझे कार्यालयात बसुन मुल्यांकन अहवाल तयार केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, २५ वर्षापुर्वीचा कागद जीर्ण होतो. साक्षीदार स्वत: होऊन सांगतात की, चांगला ठेवला तर चांगला राहतो. मी जे मुल्यांकन दिलेले आहे ते महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार तसेच मिराम टेबल्याच्या आधारे दिलेले आहे. मी त्याची प्रत दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेल्या मुल्यांकनामध्ये व ज्या आधारे मी मुल्यांकन केलेले आहे त्यामध्ये तफावत असल्याने मी ते कागदपत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रात झाडाचे जे मुल्यांकन नमुद केले आहे ते अंदाजाने केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेतक-यांना फायदा व्हावा त्याला जास्त रक्कम मिळावी यासाठी मी खोटे मुल्यांकन केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नागनाथ खराडे यांची जमीन गट क्र. ५०४ मध्ये कधीही गेलो नाही.

गैरअर्जदार क्र. ३ तर्फे विधीज्ञ श्री. बारबोले -

२. मी शासन मान्य मुल्यांकन अधिकारी आहे. मी खराडे यांच्या जमिनीमध्ये झाडांची पाहणी करण्याकरीता दि. १९.०९.२००७ रोजी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या जमिनीमध्ये जाते वेळी व मोजणी करतेवेळी शासनास नोटीस देणे बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खराडे यांच्या शेतात दि. १९.०९.२००७ रोजी गेलो होतो, त्याबाबत माझेकडे कागदापत्री पुरावा नाही. साक्षीदार स्वत: होऊन सांगतात की, मी पंचनामा केलेला आहे. त्यावेळेस तेथे गणेश सिद्रामअप्पाा खराडे, बसवंत नागाप्पा सांगळे व गंगाधर मुळे हे हजर होते. त्यावेळेस तेथे नागनाथ खराडे हजर होते. त्यावर त्यांची सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनामा त्या दिवशी त्याच ठिकाणी केला, हे दाखविण्याकरीता पंचनाम्या व्यतिरिक्त माझेकडे दुसरा पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दिवशी त्या ठिकाणी जाऊन पंचनामा केला नाही. मी झाडांचे मुल्यांकन करतवेळी त्याचे फोटो घेतले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी झाडांचे मुल्यांकन अंदाजे केलेले आहे. मी केलेले मुल्यांकन महाराष्ट्र शासनाचे परिपत्रकानुसार व मिराम टेबलच्या आधारे केल्यामुळे ते बरोबर आहे. मी मुल्यांकन करतेवेळेस शासनाचे मुल्यांकन पत्र पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मुल्यांकन मला जसे वाटेल तसे केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावर पंचाच्या सहया नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी जो मुल्यांकन अहवाल दाखल केला आहे तो सन २००८ चा दिसुन येत नाही, तो नवीन दिसतो. हे म्हणणे खरे नाही की, सन २००८ चा कागद जीर्ण दिसतो. हे म्हणणे खरे नाही की, मी मुल्यांकन अहवाल माझे कार्यालयात बसुन तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नागनाथ खराडे यांच्या शेतात कधीही गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

AWASEKAR SWATI DILIPRAO
Digitally signed by AWASEKAR SWATI DILIPRAO
Date: 2025.10.30 14:42:34 +0530

दिनांकः २९.१०.२०२५

(श्रीमती. एस. डी. अवसेकर )
दिवाणी न्यायाधीश, व स्तर, तुळजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P. D.F. file judgment /order/issues /evidence are same, word to word, as per the original judgment/order/issues/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. S. D. Awasekar<br>Civil Judge, Senior Division, Tuljapur, District -Dharashiv. |
| Date | --- | 29/10/2025 |
| Judgment/order/issues/evidence signed by the Presiding Officer on | --- | 29/10/2025 |
| Judgment/order/issues/ evidence uploaded on | --- | 30/10/2025 |